CMYK

स्वच्छतेमुळे गावाच्या सौंदर्यात भर; डोणगाव ग्रामपंचायतच्या वतीने घरोघरी कचराकुंडी वाटप >> पान 2

नारायण गडाच्या सर्व मर्यादा पाळून यंदाचा दसरा मेळावा होणार : मनोज जरांगे पाटील >> पान 3

युवकांवरील चुकीचे गुन्हे नोंदविल्या निषेधार्थ मोर्चा >> पान 4

**सुविचार**

जेव्हा एक बीज काळोख्या अंधारातून, कठोर जमिनीतून उगवू शकते तर तुम्ही का नाही.

# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034



वडील आयबी मंत्रालयात, आजोबा डीएम, आजीच्या प्रेरणेने अभिनेता बनले संजय मिश्रा

आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 61 ■ सोमवार, दि. 07 ऑक्टोबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# खामगांवमधील गावे पाणीदार होणार - उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

■ खामगांव येथे २३६५ कोटींच्या विकासकामांचा शुभारंभ

■ पाणी आरक्षणाला उपमुख्यमंत्र्याची जाहीर मंजुरी ■ पांदण रस्त्यांसाठी २५ कोटी देणार









**बुलडाणा/ प्रतिनिधी :** शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्त्वाचा मानला जाणारा जिगाव सिंचन प्रकल्प अतिशय वेगाने पूर्णत्वाकडे नेत आहोत. हा प्रकल्प आणि वैनगंगा–नळगंगा नदीजोड प्रकल्पांमुळे खामगांवमधील गावे पाणीदार होणार आहेत. शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पाणी येणार असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

खामगांव येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मैदान येथे खामगांव विधानसभा क्षेत्रातील २३६५ कोटींच्या विविध विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या यांच्या हस्ते करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. या सोहळ्याला केंद्रीय आयुष (स्वतंत्र प्रभार), आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव, आ. डॉ. संजय कुटे, आ.आकाश फुंडकर, माजी आमदार चैनसुख संचेती, माजी आमदार विजयराज शिंदे, माजी जिप अध्यक्ष उमाताई तायडे, जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, पोलीस अधीक्षक विश्र्व पानसरे, मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात, सचिन देशमुख आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस पुढे म्हणाले, २०१४ साली जिगाव प्रकल्पाला मोठ्या प्रमाणात चालना दिली. धरण बांधण्याचा निर्णय घेतला. शेतकऱ्यांच्या शेतीपर्यंत पाईपलाईनने पाणी नेवून शेतकऱ्याला थेट बांधावर पाणी उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला. आज ७ हजार कोटी रुपये जिगाव प्रकल्पासाठी दिले, त्याचे काम अतिशय वेगाने पूर्णत्वाकडे नेत आहोत. यातील एक भाग म्हणून खामगांव विधानसभा क्षेत्रातील आज झालेल्या विविध विकासकामांच्या भूमिपूजनामुळे शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पाईपलाईनने पाणी येणार आहे. यासोबतच नानाजी देशमुख कृषी समृद्धी योजना सुरू केली. या योजनेच्या माध्यमातून शंभर टक्के अनुदानावर ड्रीपद्वारे शेतकऱ्यांच्या शेतामध्ये पाणी उपलब्ध होणार आहे. यामुळे कोरडवाहूचा शिक्का पूर्णपणे पुसला जाईल आणि बागायती भाग म्हणून ओळखता येईल. या योजनांमुळे शेतकऱ्यांचे कल्याण होणार आहे, असेही ते यावेळी म्हणाले.

जिगाव प्रकल्पाचे पाणी आरक्षण मिळावे अशी मागणी आमदार आकाश फुंडकर यांनी केली होती. त्याअनुषंगाने पुढच्या ५० वर्ष खामगांवला पाणी पुरेल इतके पाणी आरक्षण मंजूर केल्याचे जाहीर करुन यापुढे पाणी टंचाई भासणार नाही, असे उपमुख्यमंत्री म्हणाले. वैनगंगा–नळगंगा नदीजोड प्रकल्पाला मंजूरी मिळाली. ९० हजार कोटींचा प्रकल्प आहे. नद्यांचे पाणी भंडारापासून बुलढाणा जिल्ह्यापर्यंत आणणार आहोत. १० लाख हेक्टर जमीन ओलीताखाली येईल. या प्रकल्पाच्या कामांची सुरुवात केली असून त्याचा फायदा खामगांव तालुक्याला होणार आहे. १०० टक्के सिंचनाखाली असलेला खामगांव तालुका अशी ओळख होईल. खामगांव शहराचे चित्र बदलत आहे. रस्ते, विकासकामे होत आहेत. तालुक्यातील पांदण रस्त्यांसाठी मार्चच्या बजेटमध्ये २५ कोटी देणार असल्याचेही उपमुख्यमंत्री यांनी यावेळी सांगितले.

गेल्या १५ वर्षांपासून लोकसभा क्षेत्राचा प्रतिनिधी आहे. या भागातील अनेक विकासकामे मार्गी लागली आहेत. खामगांव– जालना रेल्वेमार्गाला मान्यता मिळाली आहे. लवकरच कामाला सुरुवात होईल. ९० हजार कोटींचा नदीजोड प्रकल्प मंजूर झाला असून निविदा प्रक्रिया झाली आहे. काम सुरु झाले आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर मोठ्याप्रमाणात जमीन ओलीताखाली येईल. शेतकऱ्यांना विविध पीक उत्पादन घेता येईल. खामगांव येथे ५० बेडचे आयुर्वेद रुग्णालय आणि सर्व रुग्णालयातील कामांचा प्रस्ताव द्यावा. त्याबाबत कार्यवाही केली जाईल, असे केंद्रीय आयुष (स्वतंत्र प्रभार), आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी भाषणात सांगितले.

यावेळी आमदार डॉ. संजय कुटे आणि आमदार आकाश फुंडकर यांनी मनोगत व्यक्त करुन लोकोपयोगी कामाच्या मागण्या मांडल्या. त्यावर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मक प्रतिक्रिया दिली.

यावेळी जलसंपदा, सार्वजनिक बांधकाम विभाग, पायाभूत सुविधा, मृद व जलसंधारण या विभागांच्या विविध विकासकामांचा शुभारंभ उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आला. तसेच खामगांव नगरपरिषद कार्यालयाचे लोकार्पण, पात्र लाभार्थ्यांना घरकूल, शेतकऱ्यांना कृषी फवारणी पंप आदी लाभाचे वाटप करण्यात आले.

## देवेंद्र फडणवीस यांच्या ड्रीम प्रोजेक्टमूळे महाराष्ट्राला मिळाली गती

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/ प्रतिनिधी :** गेल्या १५ वर्षात आणि मुख्यमंत्री म्हणून आपल्या कार्यकाळात, देवेंद्र फडणवीस यांनी एकसंध पायाभूत धोरणासाठी एक आराखडा तयार केला, ज्यात अनेक मेट्रो मार्ग जोडण्याचा, महामार्ग बांधण्याचा प्रयत्न केलाआज या सर्व ड्रीम प्रोजेक्ट ला गती मिळाली आहे. येत्या काळात महाराष्ट्र सुजलाम सुफलाम आणि आधुनिक तंत्रज्ञानाचे परिपूर्ण बनविण्याचे महाराष्टाचे स्वप्न पूर्ण आहे.

फडणवीस यांच्या कार्यकाळात ७०१ किलोमीटर लांबीच्या मुंबई–नागपूर द्रुतगती म ार्ग किंवा समृद्धी महामार्गासह राज्यातील काही महत्वाकांक्षी पायाभूत प्रकल्पांना मंजुरी आणि प्रारंभ झाला, ज्याने आधीच प्रमुख औद्योगिक केंद्रांमधील प्रवासाचा कायापालट करण्यास सुरुवात केली आहे.

मेट्रो ३ चे आजचे उद्घाटन त्यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या प्रकल्पांच्या वाढत्या यादीत भर घालते, ज्यात मेट्रो मार्ग २ए, ७ आणि ४, तसेच जलमार्ग आणि स्म ार्ट वाहतूक व्यवस्थापन प्रणालीचा समावेश आहे. मेट्रो ३ मुळे भारतातील सर्वात गर्दीच्या शहरी केंद्रांपैकी एक असलेल्या मुंबईतील कनेक्टिव्हिटीमध्ये मोठ्या प्रमाणात सुधारणा होण्याची अपेक्षा आहे.पंतप्रधान मोदी यांच्या नुकत्याच झालेल्या महाराष्ट्र दौऱ्यांमुळे पायाभूत सुविधांच्या विकासावर सरकारचा भर अधिक ठळकपणे दिसून आला आहे. काही महिन्यांपूर्वीच त्यांनी ठाणे–बोरिवली दुहेरी बोगदा प्रकल्प आणि गोरेगाव–मुलुंड लिंक रोडसह २९,४०० कोटी रुपयांच्या अनेक प्रकल्पांचे उद्घाटन केले. या प्रयत्नांचा उद्देश केवळ गर्दी कमी करणे हा नाही तर मुंबईचा भविष्यातील विकास शाश्वत आहे हे सुनिश्चित करणे हा आहे.

पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांच्या प्रगतीवर लक्ष ठेवण्यासाठी एमएमआरडीए आणि म हाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळासारख्या संस्थांशी जवळून काम करण्यासाठी फडणवीस यांनी एक समर्पित वॉर रूम उभारला. यामुळे प्रकल्पाची अंमलबजावणी सुव्यवस्थित होण्यास आणि नोकरशाहीतील विलंब टाळण्यास मदत झाली पंतप्रधान मोदी आज मुंबईच्या पायाभूत सुविधांच्या प्रवासातील आणखी एका टप्प्याचे उद्घाटन करत असताना फडणवीसांनी घातलेला पाया महाराष्ट्राच्या शहरी आणि प्रादेशिक परिदृश्याला आकार देत आहे.

## बोपदेव घाट अत्याचार प्रकरणी तीन हजार मोबाइल नबंरची तपासणी

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/ प्रतिनिधी :** पुण्यातील बोपदेव घाटात गुरुवारी रात्री ११ वाजण्याच्या सुमारास फिरण्यासाठी गेलेल्या टेबल पॉईंट परिसरात रात्री तरुणी आणि तिचा मित्र यांच्यावर हल्ला करण्यात आला. त्यावेळी ३ आरोपी त्याठिकाणी आले. त्यांनी तरुणी आणि तिच्या मित्राला कोयत्याचा धाक दाखवला. तरूणाला मारहाण केली, त्याचा शर्ट काढला. शर्टने तरूणाचे हात बांधले, त्याच्याच पॅन्टचा पट्टा काढून त्याचे पाय बांधले. तरुणाला एका झाडाला बांधून आरोपींनी परराज्यातून पुण्यात शिकायला आलेलल्या त्या २१ वर्षीय तरुणीवर सामूहिक बलात्कार केला. ही घटना समोर आल्यानंतर पोलिसांनी घटनेचा सखोल तपास सुरू केला आहे. या ३ नराधम आरोपींकडे कोयता, चाकू अशी शस्त्रे होती, तसेच एका आरोपीच्या हातात बांबू होता. मित्राला ठार मारण्याची धमकी देऊन आरोपींनी तरुणीवर सामूहिक बलात्कार केल्याची माहिती समोर आली आहे.

**या प्रकरणात आत्तापर्यंत काय काय अपडेट आले समोर**

**पोलिसांकडून स्केच प्रसिद्ध**

या प्रकरणातील संशयित आरोपीचे स्केच कोंढवा पोलीस स्टेशनने प्रसिध्द केले आहे. याबाबत काही माहिती मि ळाल्यास खालील त्वरित संपर्क साधावा असे पोलीसांनी आवाहन केले आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक कोंढवा पोलीस स्टेशन श्री विनय पाटणकर,संपर्क क्रमांक : ८६९१९९९६८९ पोलीस निरीक्षक गुन्हे शाखा युनिट ५ श्री.युवराज हांडे संपर्क क्रमांक : ८२७५२००९४७ ९३०७५४५०४५ किंवा नियंत्रण कक्ष पुणे शहर ०२०–२६१२२८८० यावर त्वरित संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

**संशयित सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद**

शहर पोलिसांच्या तब्बल २५ टीम वेगवेगळ्या दिशेने या आरोपींचा शोध घेत आहेत. सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक डाटा यांच्या मदतीने पोलिसांचा तपास सुरू आहे. मात्र, म ोबाईल फोनला रेंज नसलेला परिसर आणि तब्बल दहा किमी अंतरापर्यंत सीसीटीव्ही नसल्याने पोलिसांच्या तपासात अडचण निर्माण झाली आहे. बोपदेव घाटाच्या सासवडच्या बाजूला तीन संशयिताच एक सीसीटीव्ही फुटेज पोलिसांना मिळाले आहे. त्या अनुषंगाने पोलिसांनी तपास सुरू केला आहे. घटना घडल्याच्या वेळेनंतर साधारण १५ मिनिटांनी हे संशयित पुढे जाऊन थांबले असले असावेत असा संशय पोलिसांना आहे. या घटनेनंतर नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.

# जनसंवाद दौऱ्यातून शिवसेनेचे शिंदे साधणार जनतेशी संवाद

## केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव राहणार उपस्थित



### शिवसेना युवा नेते तथा खा. श्रीकांत शिंदे यांच्या आगमनाने मतदार संघात चैतन्य

शिवसेनेचे युवा नेते तथा खा. श्रीकांत शिंदे हे मेहकर विधानसभा मतदारसंघात येणार असल्याने मतदार संघातील युवकांमध्ये चैतन्य पसरले आहे. खा. श्रीकांत शिंदे हे शिवसेनेचे युवा नेतृत्व करीत असून त्यांचा संपूर्ण महाराष्ट्रभर चाहता वर्ग आहे. आगामी विधानसभेच्या पार्श्र्वभूमीवर ते शिवसेनेचा बालेकिल्ला असलेल्या मेहकर लोणार मतदार संघात येत आहेत.त्यामुळे श्रीकांत शिंदे यांचा दौरा आगामी विधानसभेच्या व मतदार संघातील शिवसेनेचा उमेदवार विजयी करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरणारा आहे. शिवसेना युवा नेते तथा खा. श्रीकांत शिंदे यांच्या मेहकर विधानसभा मतदारसंघात जनसंवाद यात्रेनिमित्त होणाऱ्या आगमनाने शिवसेनेमध्ये सर्वत्र चैतन्य निर्माण झाले आहे.



### केंद्रीय मंत्री जाधव यांचा मतदार संघात चाहता वर्ग

शिवसेनेचे नेते तथा बुलढाणा लोकसभा मतदारसंघाचे तब्बल चार वेळा नेतृत्व करणारे केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांचा मेहकर विधानसभा मतदारसंघात मोठा चाहता वर्ग आहे. सामाजिक राजकीय वारसा लाभलेल्या केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या रूपाने या विभागाचे एक कणखर नेतृत्व म्हणूनही प्रतापराव जाधव यांची ओळख आहे. निष्ठावंत शिवसैनिक या सामाजिक राजकीय वारसा लाभल्याने लाभलेल्या खासदार प्रतापराव जाधव यांची आता केंद्रीय मंत्रिमंडळात वर्णी लागल्याने भविष्यात येणारे दिवस हे मेहकर मतदार संघासाठी सोनेरी दिवस ठरणार आहेत. केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांची भूमिका ही सर्वांगीण विकासासाठी अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. याचबरोबर या अगोदर त्यांनी केलेल्या मतदार संघातील विकास कामे तसेच निष्ठावंत शिवसैनिक व त्यांचे चाहता वर्ग असल्याने आगामी होऊ घातलेल्या विधानसभा मतदारसंघातही त्यांचा मोठा प्रभाव पडणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात होत आहे.



### आ. रायमुलकर यांना मतदाराची कायम पसंती

शिवसेनेचा बालेकिल्ला म्हणून संपूर्ण महाराष्ट्रात ओळख असलेल्या मेहकर विधानसभा मतदारसंघाचे नेतृत्व हे गेल्या तीन टर्म पासून आ. संजय रायमुलकर करीत आहेत. आ. रायमुलकर हे सर्वसामान्यांचे आमदार व मतदार संघातील प्रत्येक घरापर्यंत पोहोचलेले नेतृत्व म्हणून ओळखले जातात.आ. रायमुलकर यांनी मतदारसंघात त्यांना मतदारांनी आशीर्वाद देऊन तब्बल एक नव्हे तर तीन वेळा विधानसभेत पाठवले आहे. आगामी विधानसभेतही विधानसभा निवडणुकीतही आ. संजय रायमुलकर हे विजयाचा चौका मारून चौथ्यांदा नेतृत्व करतील अशी अपेक्षा मतदार संघातील मतदारांना आहे. त्यांच्या पाठीशी केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा आशीर्वाद असल्याने मतदार संघातील विकास कामांना चालना मिळणार असल्याची खमंग चर्चा..

**मेहकर :** आगामी होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीसाठी मेहकर मतदार मेहेकर विधानसभा मतदारसंघात शिवसेनेच्या वतीने दि.७ ऑक्टोबर २०२४ रोजी सायंकाळी ५ वाजता स्वातंत्र्य मैदान नगर मेहकर येथे शिवसेना युवासेना, महिला आघाडी व सर्व अंकुश संघटना मेहकर लोणार विधानसभा मतदार संघाच्या वतीने भव्य जनसंवाद दौरा आयोजित केला आहे.या दौऱ्याला शिवसेना नेते तथा खा. श्रीकांत शिंदे, केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव, आ. संजय रायमुलकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.या जनसंवाद दौऱ्यातून शिवसेना आपले शक्ती प्रदर्शन करीत असल्याचे चर्चा मतदारसंघात होत आहे. विधानसभा निवडणुकी एका महिन्यावर आली आहे. त्यामुळे




प्रत्येक पक्षाकडून जनसंवाद दौरा मिळावा आधी कार्यक्रम घेऊन पक्ष संघटन मजबूत करण्यावर भर दिला जात आहे. शिवसेनेत गत दोन वर्षांपूर्वी पडलेल्या फुटीमुळे पदाधिकारी व मतदार विभागले आहेत. असे असले तरी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी संपूर्ण शिवसेना आपल्या हातात घेऊन महाराष्ट्रात सत्ता काबीज केली आहे.गत दोन वर्षांपासून त्यांनी समाजपयोगी निर्णय घेत विकास कामाचा धडाका लावला आहे. त्यामुळे ते एक कणखर नेतृत्व व विकासाचे राजकारण करणारे नेते म्हणून ओळखले जाऊ लागले आहेत. आगामी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत मेहकर विधानसभा मतदारसंघ हा गत १५ वर्षापासून शिवसेनेचा आहे. तो कायम राहावा, यासाठी शिवसेनेच्या वतीने जनसंवाद दौरा आयोजित केला असल्याचं बोलला जात आहे. या दौऱ्याला शिवसेना नेते श्रीकांत शिंदे, केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव,आ. संजय रायमुलकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.या जनसंवाद दौऱ्यात शिवसेना सत्तेत आली तेव्हापासून करण्यात आलेल्या विकास कामाचा लेखाजोखा मांडणार असल्याची माहिती आहे. त्याचबरोबर मेहकर मतदारसंघात पुन्हा शिवसेना उमेदवार विजयी व्हावा, यासाठी सुद्धा मतदार पदाधिकारी यांच्यासोबत चर्चा करून त्या अनुषंगाने नियोजन करण्यात येणार असल्याची सुद्धा चर्चा आहे. एकंदरीत शिवसेना जनसंवाद दौरा निमित्ताने मेहकर विधानसभा मतदारसंघात एक प्रकारे संवाद दौऱ्यातून थेट जनतेची संवाद साधणार असल्याची माहिती आहे.



**देविदास खनपटे**
मुख्य संपादक

CMYK

## तिसऱ्या महायुध्दाचे ढग...

इस्त्रायल आणि इराण यांच्यातील संघर्षाने आता गंभीर वळण घेतले आहे. इस्त्रायलने गेल्या आठवड्यात लेबनॉनमधील इराण समर्थित हिजबुल्ला या दहशतवादी संघटनेचे सात म्होरके सात दिवसांमध्ये टिपले. तसेच या संघटनेचा प्रमुख नसरल्ला हाही इस्त्रायलच्या अचूक हल्ल्यात मारला गेला. नंतर इराणने इस्त्रायलवर २०० हून अधिक क्षेपणास्त्रांचा मारा केला. तथापि, इस्त्रायल आणि अमेरिका यांनी आपल्या भक्कम आणि अत्याधुनिक संरक्षण यंत्रणेच्या माध्यमातून इराणचा हा हल्ला व्यर्थ ठरविला आहे. इराणने डागलेल्या क्षेपणास्त्रांपैकी ९९ टक्के क्षेपणास्त्रे इस्त्रायलवर कोसळण्यापूर्वीच निकामी करण्यात आली. त्यामुळे या हल्ल्यात इस्त्रायलची कोणतीही लक्षणीय हानी झाली नाही. तथापि, इराणच्या हल्ल्याचा सूड उगविणार असा निर्धार या देशाने व्यक्त केला आहे. तसेच आपल्या उत्तर सीमेवर असणाऱ्या लेबनॉन देशाच्या दक्षिण भागात वावर असणाऱ्या हिजबुल्ला या संघटनेला नष्ट केल्याशिवाय आम्ही विश्रांती घेणार नाही, असे स्पष्ट प्रतिपादन इस्त्रायलने केले आहे. 'इराणी जनता धर्मांध नेत्यांपासून मुक्त होण्याचा दिवस जवळ आलेला आहे. ' अशा अर्थाचे जाहीर विधान काही दिवसांपूर्वी करुन या देशाचे पंतप्रधान बेंजामिन नेत्यान्याहू यांनी एक वेगळाच संदेश इराणच्या जनतेला दिलेला आहे. या सर्व घडामोडींचा आणि विधानांचा अर्थ असा निघतो की आता इस्त्रायल केवळ इराणने पंखाखाली घेतलेल्या दहशतवादी संघटनांशीच नव्हे, तर प्रत्यक्ष इराणशीही संघर्ष करण्याच्या दृष्टीने सज्ज आहे. परिणामी, आता हा संघर्ष कोणत्या पातळीपर्यंत न्यायचा हे प्रामुख्याने इराणवर अवलंबून आहे. एक बाब मात्र निश्र्चित आहे, की इस्त्रायल आणि इराण यांच्यात थेट युद्धाला प्रारंभ झालाच, तर ते या दोन देशांपुरतेच मर्यादित राहणार नाही. जगातील महासत्ता प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष पद्धतीने या संघर्षात उतरतीलच आणि ती महायुद्धाची स्थिती असेल. अशा व्यापक युद्धाचे परिणाम भारतासह सर्व जगावर होणार आहे. सध्या जगाची अर्थव्यवस्था मंदीच्या झाकोळात वावरत आहे. अशा परिस्थितीत असे युद्ध झाल्यास अर्थव्यवस्थेला त्याचा मोठा फटका बसणार हे निश्र्चित आहे. त्यामुळे अशी स्थिती येऊ द्यायची नसल्यास सर्व संबंधितांना सध्याचा काळ संयमाने हाताळावा लागणार आहे. यासाठी एकमेकांना समजून घ्यावे लागणार आहे. प्रक्षोभकता टाळावी लागणार आहे. सध्याच्या स्थितीला इस्त्रायलच जबाबदार असून त्याने मारलेले दहशतवादी म्होरके हे जणू काही हुतात्मे आहेत, अशा प्रकारची भाषा काही तथाकथित विचारवंतांनी चालविलेली आहे. पण ती वस्तुस्थिती नाही, हे एखादे लहान मूलही जाणू शकेल. गेल्या वर्षी ७ ऑक्टोबरला हमासच्या दहशतवाद्यांनी इस्त्रायलवर जो अमानुष हल्ला केला, तो खरे तर आजच्या या स्थितीला कारणीभूत आहे. कारण, तो झाला नसता, तर इस्त्रायल स्वत:हून अशी परिस्थिती निर्माण करण्याची शक्यता नव्हती. या हल्ल्यामुळे काही पॅलेस्टाईनला स्वातंत्र्य मिळणार नव्हते. तसे ते मिळाले नाहीच. उलट ती शक्यता आणखी दुरावली. मग तो हल्ला का करण्यात आला? असा प्रश्र्न तथाकथित शांततावा विचावंत कधी हमाससारख्या संघटनेला का विचारत नाहीत? मध्यपूर्वेत शांतता राखण्याची जबाबदारी केवळ इस्त्रायल या एकाच देशाची नाही. त्या देशाने हल्ल्याला प्रतिहल्ला हे धोरण आजवर उपयोगात आणल्याने त्या देशाचे अस्तित्व टिकू राहिले आहे. इस्त्रायल आणि त्याची ६० लाख ज्यू जनता यांनाही त्यांच्या भूमीत सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे. सध्या इस्त्रायल देश ज्या भूमीत आहे ती या देशाने 'बळकावली' आहे, हा बिनबुडाचा आरोप काहीजण आजही करतात. तो संदर्भहीन आहे. इस्त्रायलच्या स्थापनेला आता जवळपास ८० वर्षांचा कालावधी झाला आहे. कोणती भूमी कोणाची, याचा निवाडा करण्यासाठी जर कोणी इतिहासात ७०–८० वर्षे मागे जाणार असेल तर त्याच तर्कशास्त्रानुसार हजारो वर्षे मागे जाता येईल. मग सगळीच सूत्रे पालटतील. ज्या धार्मिक किंवा पांथिक समूहांजवळ आज प्रचंड प्रमाणात भूमी आहे, त्या धर्मांचा किंवा पंथांचा त्याकाळी जन्मही झाला नव्हता. तसेच, सध्या त्यांच्यापाशी जी भूमी आहे, ती त्यांनी अन्य लोकांकडून बळकावूनच मिळविली आहे, असेही सिद्ध करणे अवघड नाही. कारण इतिहासात कोणी किती मागे जायचे, याचा काहीही नियम नाही. पुन्हा अशा तर्कटांमध्ये एक विसंगती आहे. इस्त्रायलची आजची भूमी ही मूळची पॅलेस्टाईनची आहे असे मानणारे लोक 'काश्मीर'ला हाच न्याय लावतात काय? काश्मीरचा समावेश भारतात लेखी कागदपत्रांनुसार पूर्णांशाने आणि कायद्याने झाला आहे. मात्र या प्रदेशाचा दोन तृतियांश भाग पाकिस्तान आणि चीन या देशांनी बेकायदेशीररित्या बळकावला आहे. तो त्यांनी भारताला परत द्यावा, असे हे विचारवंत कधीच म्हणत नाहीत. प्रचंड क्षेत्रफळाचा तिबेट चीनने घशात घातला तो काही कायदेशीर मार्गाने नव्हे. पण त्यालाही हे विचारवंत जाब विचारु शकत नाहीत. पण इस्त्रायलचा प्रश्र्न आला की यांची कथित 'न्यायभावना' एकाएकी उफाळून येते. इस्त्रायलची निर्मिती का आणि कशी झाली याची या मंडळींनी एकदा नीट माहिती करुन घेणे आवश्यक आहे. पॅलेस्टाईन हा प्रदेश खरे तर मूळचा ज्यूंचाच आहे आणि त्यानंतर तो अनेकदा अनेक समाजांच्या ताब्यात गेला आहे, असे इतिहास पाहता समजून येते. पण इराणसारख्या देशाला इस्त्रायलचे आणि तेथील ज्यू समाजाचे अस्तित्वही खुपते. त्यामुळे इस्त्रायलचा नायनाट करण्याची त्या देशाच्या धार्मिक नेतृत्वाची महत्वाकांक्षा असून ती त्या नेतृत्वाने स्पष्टपणे अनेकदा बोलून दाखविली आहे. त्यामुळे इस्त्रायलला आपले अस्तित्व टिकविण्यासाठी प्रतिहल्ले करावे लागतात आणि त्या देशाचा तो अधिकारही आहे, जसा भारताचा अधिकार संपूर्ण काश्मीरवर आहे. तेव्हा, कोणीही एकांगी, तसेच एककल्ली विचार करुन मध्यपूर्वेतील समस्या संपणार नाहीत. त्यासाठी संयम राखण्याची आणि वाट पाहण्याची आवश्यकता आहे. ७ ऑक्टोबरसारखे हल्ले करणारे दहशतवादी अशा समस्या चिघळवितात. त्यामुळे तशा हल्ल्यांचे कौतुक कोणीही (निदान खऱ्या शाहण्यांनी तरी) करु नये. पण आपल्याला सारे काही समजते अशा भ्रमात वावरणारे हे लोक एवढा 'कॉमनसेन्स' ही दाखवित नाहीत, हीच खरी आणि महत्त्वाची समस्या आहे.

# स्वच्छतेमुळे गावाच्या सौंदर्यात भर; डोणगाव ग्रामपंचायतच्या वतीने घरोघरी कचराकुंडी वाटप

## सरपंच शिवचरण आखाडे यांचा स्तुत्य उपक्रम

दैनिक आपला विदर्भ



**डोणगाव/विशेष प्रतिनिधी :** गाव स्वच्छ व सुंदर राहून सौंदर्यात भर पडावी, यासाठी ग्रामपंचायतीने पुढाकार घेत गावात घरोघरी कचराकुंड वाटप केल्या आहेत. तसेच कचराकुंडी कचरा संकलनासाठी ग्रामपंचायत च्या वतीने तीन घंटागाड्या सुद्धा उपलब्ध करून दिल्या आहेत. ग्रामपंचायत पुढाकारामुळे आता गाव स्वच्छ व सुंदर बनत आहे. सरपंच शिवचरण आखाडे यांनी गावाच्या सर्वांगीण विकासासाठी व नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने घेतलेला हा निर्णय गाव स्वच्छ व स्वच्छ व सुंदर करण्यासाठी महत्त्वाचा ठरला आहे. सरपंच शिवचरण आखाडे यांच्या या स्तुत्य उपक्रमाबद्दल गावकऱ्यांत मात्र आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. ग्रामपंचायतींनी स्वच्छतेच्या अनुषंगाने आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशा सूचना प्रशासनाने दिल्या होत्या. त्यासाठी वित्त आयोगाचा निधीही खर्च करण्याची मुभा देण्यात आली होती. त्याच अनुषंगाने डोणगाव ग्रामपंचायतीच्या सरपंच शिवचरण आखाडे यांनी स्वच्छतेच्या दृष्टीने एक पाऊल पुढे टाकत घरोघरी कचराकुंडीचे वाटप केले. ग्रामपंचायतीने पंधरावा वित्त आयोगातील स्वच्छता अभियान अंतर्गत दि.१ ऑक्टोबरपासून कचरा कुंडीचे वाटप करण्यात येत आहे. सुका व ओला कचरा वर्गीकरणासाठी प्रत्येक कुटुंबाला दोन कचराकुंडी दिल्या जात आहेत. पंधरावा वित्त आयोगामधून २० लाख २६ हजार ५०० रुपयांच्या निधीतून कचराकुंडी खरेदी करण्यात आल्या आहेत. प्रत्येक कुटुंबाला, तसेच जिल्हा परिषद शाळा यांना कचराकुंडी वाटप करण्यात आल्या आहेत. या कचराकुंडी वाटप सरपंच शिवचरण आखाडे, ग्राम विकास अधिकारी दीपक तांबारे, माजी सरपंच रेखा पांडव, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामपंचायत कर्मचारी, सफाई कर्मचारी आदींची उपस्थिती होती. ग्रामपंचायतच्या वतीने घेतलेल्या निर्णयाबद्दल नागरिकांमध्ये आनंद व्यक्त केला जात असून ग्रामपंचायत सरपंच शिवचरण आखाडे यांच्यावरही कौतुकाचा वर्षाव होत आहे.

शासनाच्या वतीने तीन इलेक्ट्रिक घंटागाड्या डोणगाव येथे स्वच्छतेसाठी शासनाच्या वतीने तीन इलेक्ट्रिक घंटागाड्या देण्यात आल्या आहेत. सदर गाड्या इलेक्ट्रिक असल्याने ग्रामपंचायतीचा खर्च वाचणार असून गावातही स्वच्छता होईल.

### नागरिकांनी सहकार्य करावे : सरपंच आखाडे

गाव स्वच्छ व सुंदर करण्यासाठी ठेवण्यासाठी ग्रामपंचायतीच्या वतीने संपूर्ण प्रयत्न केले जात आहे. गावातील प्रत्येक घराचा व घरातील प्रत्येक व्यक्तीच्या आरोग्याचा विचार करून ग्रामपंचायत प्रशासनाच्या वतीने स्वच्छता ठेवण्याबरोबरच आरोग्य ही निरोगी राहावे, यासाठी काळजी घेतली जाते. गावात घरोघरी कचराकुंडी वाटप करण्यात आली आहे. उर्वरित घरांना सुद्धा लवकरच कचराकुंडी वाटप करण्यात येणार आहे.कचरा संकलनासाठी तीन घंटागाड्या सुद्धा कार्यान्वित केल्या आहेत. नागरिकांनी स्वच्छतेसाठी ग्रामपंचायतीला सहकार्य करावे, असे आवाहन सरपंच शिवचरण आखाडे यांनी केले.

### ग्रामपंचायतचे विशेष अभिनंदन : शैलेश सावजी

डोणगाव ग्रामपंचायततीच्या इतिहासात विद्यमान सरपंच शिवचरण आखाडे,उपसरपंच शाम इंगळे, ग्रामविकास अधिकारी तसेच ग्रामपंचायत सदस्य यांनी गावाच्या विकासासाठी अत्यंत चांगला निर्णय घेत एक महत्त्वाचे पाऊल टाकले आहे.गावाची साफसफाई करून गावाला सुंदर बनविण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. ग्रामपंचायतच्या इतिहासात अनेकांची सत्ता आली, अनेकांनी ग्रामपंचायत विकासासाठी प्रयत्न केले अनेक जण कुचकामी ठरले. परंतु विद्यमान सरपंच व पदाधिकारी अधिकाऱ्यांनी गाव स्वच्छ व सुंदर करण्यासाठी अत्यंत चांगला निर्णय घेत वैयक्तिक लाभ देण्याची योजना राबवली आहे. या निर्णयाबद्दल ग्रामपंचायत पदाधिकारी व अधिकारी यांचे स्वागत आहे. तसेच या अगोदर प्रशासकीय काळात स्वच्छतेच्या नावाखाली खरेदी करण्यात आलेल्या वस्तूचे कुठेही उद्घाटन झाले नाही, त्या वस्तूही दिसून आल्या नाहीत. त्यामुळे लाखो रुपयांच्या खरेदी केलेल्या वस्तुंची चौकशी करून त्या वस्तुंची किंमत संबंधितकाकडून वसूल करावी,अशी मागणी ही बुलढाणा जिल्हा काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष शैलेश सुबोध सावजी यांनी करून विद्यमान सरपंच व पदाधिकाऱ्यांचे विशेष कौतुक केले आहे.

# राहुल गांधींमध्ये ख्रिश्चन आईने बिंबवलेले संस्कार, कोल्हापुरात येऊन अंबाबाईच्या दर्शनाला गेले नाहीत, भाजपचे टीकास्त्र

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई/ प्रतिनिधी :** काँग्रेस नेते राहुल गांधी काल कोल्हापूर दौऱ्यावर आले होते. या दौर्यावरून आता भाजपने जोरदार टीका केली आहे. राहुल गांधी ऐन नवरात्रीत कोल्हापूरला येऊन अंबाबाईच्या दर्शनाला गेले नाहीत, यावरुन काँग्रेस किती हिंदुद्वेषी आहे हे कळाले, असे भाजप आध्यात्मिक समन्वय आघाडीचे प्रदेशाध्यक्ष आचार्य तुषार भोसले यांनी म्हटले आहे.

कोल्हापूरमध्ये राहुल गांधी यांचा दोन दिवस दौरा होता. राहुल गांधी यांच्या हस्ते कसबा बावड्यातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे लोकार्पण करण्यात आले. यानंतर देशातील आरक्षणाचे जनक करवीर नगरीचे विधाते छत्रपती शाहू महाराजांच्या समाधी स्थळी राहुल गांधींनी अभिवादन केले. मात्र त्यांनी कोल्हापूरला येऊन अंबाबाईचे दर्शन घेतले नाही. यावरून भाजपने आता निशाणा साधला आहे.

तुषार भोसलेंची राहुल गांधींवर टीका

तुषार भोसले म्हणाले की, काँग्रेस पार्टी हिंदुद्वेषी पार्टी आहे. याचे उत्तम उदाहरण म्हणजे काल राहुल गांधी ऐन नवरात्रीत कोल्हापूरला येऊन सुद्धा अंबाबाईच्या दर्शनाला गेले नाहीत. याचे कारण त्यांच्या ख्रिश्चन आईने बिंबवलेले ख्रिश्चन संस्कार तर दुसरीकडे लोकसभेला एकगठ्ठा मिळालेली मुसलमानांची मते गमावण्याची भीती आहे. महाराष्ट्रातल्या सजग हिंदूंनी काँग्रेस पार्टीचा हा हिंदू विरोधी चेहरा ओळखला पाहिजे आणि त्यांना महाराष्ट्रातून हद्दपार केले पाहिजे, अशी टीका त्यांनी राहुल गांधींवर केली आहे.

राहुल गांधींचा भाजपवर हल्लाबोल



दरम्यान, राहुल गांधींनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे लोकार्पण सोहळ्याच्या भाषणात भाजपवर जोरदार हल्लाबोल केला. त्यांनी म्हटलं की, शिवाजी महाराजांनी आपल्याला संदेश दिला, की हा देश सर्वांचा आहे. इथे कोणावरही अन्याय होता कामा नये. त्याच विचारांचं प्रतिबिंब आज आपल्याला संविधानात दिसून येत आहे. संविधानात अशी एकही तरतूद नाही, जी शिवाजी महाराजांच्या विचारातून आलेली नाही. त्यांच्या विचारातून संविधानाची निर्मिती झाली आहे. शिवाजी महाराज आणि शाहू महाराजांसारखी लोक जन्माला आली नसती, तर आपलं संविधानही नसतं. ज्यावेळी शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक होणार होता, तेव्हा भाजपाच्या विचारधारेच्या लोकांनी त्यांचा राज्याभिषेक होऊ नये, यासाठी प्रयत्न केले होते. त्यामुळे आज सुरु असलेली विचारधारेची लढाई ही खूप जुनी आहे. या विचारधारेविरोधात शिवाजी महाराजदेखील लढले होते आणि आता याच विचारधारेच्या विरोधात काँग्रेस पक्षही लढतो आहे. ज्याप्रकारे या लोकांनी शिवाजी महाराजांच्या राज्यभिषेकाला विरोध केला, त्याप्रमाणे आताच्या सत्ताधाऱ्यांनी संसदेच्या उद्घाटनाला आदिवासी राष्ट्रपती असलेल्या द्रौपदी मुर्मू यांना बोलवलं नाही, असे म्हणत राहुल गांधींनी भाजपवर निशाणा साधला होता.

# शिवसेना पक्षप्रमुख जो उमेदवार देतील तो उमेदवार आम्हाला मान्य राहील

## पत्रकार परिषदेत कृषी उ.बा. समितीचे संचालक मोरे यांची माहिती : लोणार येथे पत्रकार परिषद

दैनिक आपला विदर्भ





**लोणार/प्रतिनिधी :** शिवसेना प्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे हे मेहकर लोणार मतदार संघासाठी जो उमेदवार देतील तो आम्हाला मान्य राहील, त्या उमेदवाराला आम्ही संपूर्ण ताकतीनिशी निवडून आणू अशी ग्वाही लोणार कृषी उत्पन बाजार समितीचे संचालक विजय मोरे यांनी दिली. ते लोणार येथील मंठा रोडवरील हॉटेल अथर्व येथे दि.६ ऑक्टोबर रोजी लोणार तालुक्यातील पदाधिकारी बैठक व पत्रकार परिषदेत बोलत होते.

या पत्रकार परिषेदेमध्ये पुढे बोलताना लोणार कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक विजय मोरे म्हणाले की, शिवसेनाप्रमुख उध्दव ठाकरे जो उमेदवार देतील किंवा महाविकास आघाडीचा जो उमेदवार राहील तो उमेदवार मान्य असेल. असे सांगितले.

तर विभाग प्रमुख राजु बुधवत यांनी शिवसेनाप्रमुख व महाविकास आघाडी जो उमेदवार देतील त्या उमेदवाराचे काम प्रमाणिक पणे करु असे मत त्यांनी व्यक्त केले.

शिवसैनिक सुदन अंभोरे यांनी आपले मत व्यक्त करतांना सांगीतले की, मेहकर विधानसभा मतदारसंघ सन २००९ मध्ये अनुसूचीत जातीसाठी राखीव झाला होता. त्यावेळेस उमेदवाराची स्पर्धा जास्त नव्हती, परंतु या वेळेस शिवसेना पक्षातील आमदारांनी गद्दारी केल्यामुळे पक्षाकडे ईच्छुक उमेदवाराची संख्या वाढत आहे. काही मतदार संघातील उमेदवार असले तरी फक्त त्यांची जन्मभूमी मतदार संघ आहे. मात्र त्यांची कर्मभूमी बाहेरील आहे. काही लोकांनी शिवसेना पक्षात प्रवेश करण्या अगोदर वेगळया पक्षाचे पदाधिकारी होते.

सन २००९ च्या अगोदर बुलढाणा लोकसभा मतदार संघात मान्य बाळकृष्ण वासनीक,मुकुलजी वासनीक, आनंदराव आडसुळ यांनी सुध्दा अनेक वर्ष बुलढाणा लोकसभा मतदार संघाचे खासदार होते. हे तिन्ही जण मतदार संघाच्या बाहेरील होते. तरी सुध्दा बुलढाणा जिल्ह्यातील लोकांनी त्यांना स्वीकारले होते. प्रश्र्न मेहकर मतदार संघातील किंवा मतदार संघाबाहेरचा नाही. शिवसेना पक्षप्रमुख उध्दव ठाकरे जो उमेदवार देतील त्या उमेदवाराचे काम आम्ही प्रमाणिक पणे करु आम्ही पक्षनिष्ठ आहोत व्यक्तीनिष्ठ नाही. असे ते म्हणाले तर लोणार तालुका उपप्रमुख श्रीकांत नागरे यांनी आपले मत व्यक्त करताना दि.५ ऑक्टोबर २०२४ रोजी लोणार मतदार तालुक्याला उमेदवारी द्यावी, अन्यथा आम्ही दुसऱ्या उमेदवाराचे काम करू अशी चर्चा होती. या चर्चेला व आपल्याला कोणताही अधिक आधार नाही. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे जो उमेदवार देतील त्या उमेदवारास निवडून आणण्यासाठी आम्ही सर्व पदाधिकारी जिवाचे रान करु अशी ग्वाही दिली.

युवा सेना तालुकाप्रमुख जिवन घायाळ पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर आमचा पूर्ण विश्र्वास आहे असून त्यांनी जो उमेदवार दिला. त्या उमेदवारास पुर्ण तन मन धनाने सहकार्य करू, त्यांचा प्रचारासाठी आम्ही शिवसैनिक छातीला माती लाऊन मैदानात उतरु आणि उमेदवारास नक्कीच निवडुण आणू. असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. पांडुरंग घोडके यांनी उध्दवसाहेब ठाकरे यांनी जो उमेदवार देतील त्याचे प्रमाणिकपणे काम करू अशी आश्वासन दिले. या पत्रकार परिषदेला शिवसेना तालुका उपप्रमुख परमेश्र्वर दहातोंडे, तालुका संघटक कैलास अंभोरे, अल्पसंख्यांक तालुका प्रमुख सैय्यद उमर, शहर संघटक तान्हाजी मापारी, युवासेना शहर प्रमुख लालुभाई,गट प्रमुख विष्णु अवचार, युवासेना सहसचिव राजु मुळे, गट प्रमुख डॉ. राजेश मोरे, कृषी उत्पन्न बाजार समिती माजी संचालक पुंजाराम जाधव, चिंचोली शाखा प्रमुख प्रतापराव सांगळे, शिवसेना नेते गोपाल मापारी, शाखा प्रमुख युवराज दराडे, शाख प्रमुख राजु दहातोंडे, शिवसैनिक बद्री कायंदे, शिवसैनिक सुरेश पौळकर आदी पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते. या पत्रकार परिषदेचे नियोजन लोणार कृषी उत्पन बाजार समितीचे संचालक तेजराव घायाळ यांनी केले होते.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### सरदार पटेल यांचा पुतळा उभा राहिला पण छत्रपतींचा अजून उभा राहीला नाही; संभाजीराजेंचा उद्विग्न सवाल

दैनिक आपला विदर्भ

**नवी मुंबई/प्रतिनिधी** : अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभारण्याची घोषणा झाली तेव्हा आम्हाला आनंद झाला होता. देशाच्या आर्थिक राजधानीत शिवाजी महाराजांच्या किर्तीला साजेसं स्मारक होणं, ही अभिमानाची बाब होती. त्यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शिवस्मारकाचं जलपूजन केले. मात्र, आता आठ वर्ष उलटल्यानंतरही शिवस्मारकाच्या कामाला सुरुवात झालेली नाही. गुजरातमध्ये सरदार पटेलांचा पुतळा उभा राहिला पण महाराष्ट्रात अजून छत्रपती शिवरायांचा पुतळा उभा राहिला नाही, असे वक्तव्य संभाजीराजे छत्रपती यांनी केले. ते रविवारी नवी मुंबईत प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

संभाजीराजे छत्रपती यांच्या नेतृत्त्वाखाली रविवारी नरेंद्र मोदींनी जलपूजन केलेले अरबी समुद्रातील शिवस्मारक शोधण्याची मोहीम आयोजित करण्यात आली होती. या पार्श्वभूमीवर गेट वे ऑफ इंडियाच्या परिसरात कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर संभाजीराजे यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना म्हटले की, पंतप्रधान मोदी यांनी अरबी समुद्रातील शिवस्मारकाचं जलपूजन केल्यानंतर मी एक-दोन वर्षे थांबलो होतो. त्यानंतर मी तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्धव ठाकरे आणि त्यानंतरचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे शिवस्मारकाबाबत विचारणा केली. शिवस्मारक बांधण्यासाठी समिती स्थापन होऊन काम का सुरु झाले नाही, असे मी विचारले. त्यावर मला सांगण्यात आलं की, अरबी समुद्रात शिवस्मारक उभारण्यासाठी पर्यावरणीयदृष्ट्या सगळ्या परवानग्या मिळालेल्या नाहीत. केंद्रात तुमचं सरकार आहे, राज्यात तुमचं सरकार आहे. मग हा प्रश्न मार्गा का लागत नाही, असा सवाल संभाजीराजे यांनी उपस्थित केला.

१०० टक्के क्लीअरन्स नसतान पंतप्रधान मोदी शिवस्मारकाच्या जलपूजनाला कसे आले? संभाजीराजेंचा सवाल

पंतप्रधान हा देशाचा प्रथम नागरिक असतो. मग सर्व परवानग्या मिळाल्या नसता ते शिवस्मारकाच्या जलपूजनाला कसे आले? मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या तोंडावर शिवस्मारकाचं घाईगडबडीत जलपूजन करण्यात आले. त्यानंतर एल अँड टी कंपनीला टेंडर देण्यात आले. पण त्यानंतर ८ वर्षात पुढे काही घडलेच नाही. शिवस्मारकासाठीचे करोडो रुपये कुठे गेले? आम्ही शोधमोहीम वेळी कायदा हातात घेणार नाही. पण आम्हाला समुद्रात जाऊ न देण्यासाठी बोटवाल्यांना भाजपकडून धमकावले जात आहे. त्यांचा परवाना रद्द करण्याच्या धमक्या दिल्या जात आहेत. पण आम्ही शिवस्मारकाचे जलपूजन झालेल्या जागी पोहोचणारच, असा निर्धार संभाजीराजे छत्रपती यांनी व्यक्त केला.

### जरांगे-पाटलांना पाहताच अर्जुनच्या वडिलांच्या अश्रुंचा बांध फुटला, मराठा आरक्षणासाठी आणखी एका तरुणाचे बलिदान

दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी** : बीडच्या जिल्हा परिषद कार्यालय परिसरात झाडाला गळफास घेतलेला एक मृतदेह आढळून आला. अर्जुन कवठेकर असं या तरुणाचे नाव असून मराठा आरक्षणाची मागणी करत या तरुणाने आत्महत्या केली होती. दरम्यान घटनेची माहिती मनोज जरांगे पाटील यांना मिळाल्यानंतर त्यांनी शासकीय जिल्हा रुग्णालयात जाऊन कवठेकर कुटुंबियांची भेट घेत सांत्वन केले आहे.

मनोज जरांगे पोहचताच कुटुंबाने एकच टाहो फोडला. तर कुटुंबीयांना पाहून मनोज जरांगेंना देखील अश्रू अनावर झाले. यावेळी अर्जुन कवठेकर यांचे यांचे वृद्ध आई-वडील, पत्नी, मुलगा, मुलगी आणि अन्य नातेवाइकांनी हंबरडा फोडला. मराठा समाजाला आरक्षण मिळालेच पाहिजे, अशी सुनीलची भावना होती आणि ते आरक्षण मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखालीच मिळू शकेल असा विश्वासही त्यांना होता, असे त्यांच्या नातेवाइकांनी जरांगे यांना सांगितले. जरांगे यांनी तासभर बसून कावळे कुटुंबीयांचे सांत्वन केले. सांत्वन करताना जरांगे यांचे डोळेही पाणावले होते. त्यांच्याशी संवाद साधताना मराठा समाज कवठेकर कुटुंबीयांना उघड्यावर सोडणार नाही. समाजासाठी दिलेले बलिदान समाज कदापि विसरणार नाही, अशी ग्वाही दिली.

पोलीस अधिक तपास करत आहे

आज सकाळच्या सुमारास जिल्हा परिषद कार्यालय परिसरात एका लिंबाच्या झाडाला अर्जुन कवठेकर यांचा गळफास घेतलेला मृतदेह आढळून आला. त्यांच्या खिशामध्ये एक सुसाईड नोट आढळून आली असून त्यात सरकार मराठा समाजाला आरक्षण देत नाही.. दिलेल्या शब्द पाळत नाही.. त्यामुळे मराठा बांधवांनी एकजूट व्हावे.. असा मजकूर लिहून त्यांनी आत्महत्या केल्याचं पोलिसांकडून सांगण्यात आले आहे. अर्जुन कवठेकर हे उखंडा गावचे रहिवासी असून ते खाजगी बसवर चालक होते. या प्रकरणाचा पोलीस अधिक तपास करत आहेत.

आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल कोणीही उचलू नका, मनोज जरांगेंचे आवाहन

मराठ आरक्षणाची मागणी पूर्ण करण्यासाठी आत्महत्यांची सत्र सुरू आहे. मनोज जरांगे यांनी त्यांच्या समर्थकांना आत्महत्येसारखे पाऊल न उचलण्याचे आवाहन केलं आहे. आरक्षण तुमच्यासाठी आहे. तुम्ही माझ्यासाठी परिवारापेक्षाही जास्त आहेत. आपल्याला मरायचे नाही, लढायचे आहे, त्यामुळे कोणीही टोकाचे पाऊल उचलू नये. आत्महत्या केल्याने आपल्याला न्याय मिळणार नाही, असे मनोज जरांगे म्हणाले

मराठा आंदोलक मनोज जरांगे यांचे जनसंपर्क कार्यालय सुरू करण्यात आले आहे. धुळे सोलापूर महामार्गावर शहागड येथील पैठण फाटा येथे मनोज जरांगे यांचे जनसंपर्क कार्यालय आहे. गेल्या अनेक दिवसापासून याचं काम सुरू होतं, दरम्यान नारायण गडावरील दसरा मेळावाच्या निमित्ताने मनोज जरांगे हे धाराशिव आणि परभणी जिल्ह्यातील आंदोलकांसोबत बैठक घेणार आहेत.

# नारायण गडाच्या सर्व मर्यादा पाळून यंदाचा दसरा मेळावा होणार : मनोज जरांगे पाटील

दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी** : जवळील नारायणगड येथे मनोज जरांगे पाटील यांचा पहिला दसरा मेळावा होणार आहे. याच ठिकाणची पाहणी करण्याकरिता पाटील नारायणगड येथे आले होते. या ठिकाणी ४०० एकर मध्ये पार्किंगची व्यवस्था करण्यात आली. तर उर्वरित जागेवर दसरा मेळाव्याचे आयोजन करण्यात येणार आहे. बर नारायणगडाच्या सर्व मर्यादा




पळून यंदाचा हा पहिला मेळावा या ठिकाणी साजरा केला जाणार आहे अशी माहिती मनोज रंगे पाटील यांनी दिली.

नारायण गडाचे महंत शिवाजी महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत जरांगे पाटील यांनी दसरा मेळाव्याच्या व्यासपीठाच्या उभारणीचे नारळ फोडून पूजन केले गेले. यावेळी नियोजनाबाबत अधिक माहिती देताना मनोज रगे पाटील यांनी सांगितले की,दसरा मेळाव्यास येणाऱ्या भाविकांसाठी विशेष आरोग्य पथक नेमण्यात आले आहे. या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची विशेष काळजी घेतली जाणार आहे. राज्यातल्या येणाऱ्या भाविकांसाठी गडाच्या पायथ्याशी असणाऱ्या गावातही व्यवस्था करण्यात येणार आहे. प्रत्येक जण दसरा मेळाव्याची वाट बघत आहे. कितीही लोक आले तरी त्यांची पूर्ण व्यवस्था इथे करण्यात येणार आहे. या दसरा मेळाव्यातून कुठलेही राजकारणा विषयी भाष्य केले जाणार नाही. मेळावा हा पूर्णपणे पारंपरिक असणार आहे. दसरा मेळावा साडेतीन मुहूर्तापैकी एक असल्याने याला हिंदू धर्मात महत्त्व आहे. दुःखाकडून सुख समृद्धीकडे जाण्याचा संदेश या दिवशी देण्यात येईल. गडाच्या सर्व मर्यादा पाळून यंदाचा दसरा मेळावा होणार असल्याचे जरांगे पाटील माध्यमांशी बोलताना सांगितले.

> विखे पाटील यांनी रात्री भेट घेतली आहे. मला अनेक जण भेटायला येतात. विखे पाटील सुद्धा भेटायला आले होते. त्यांच्याबरोबर मराठा आरक्षण आणि सामाजिक विषयावर चर्चा झाली.
>
> **-मनोज जरांगे पाटील.**

## चेंबूरमध्ये आगीची दुर्घटना, एकाच कुटुंबातील सात जणांचा होरपळून मृत्यू

**मुंबई/प्रतिनिधी** : देशाच्या आर्थिक राजधानीत आगीची भीषण दुर्घटना घडली आहे. चेंबूरच्या सिद्धार्थ कॉलनीमध्ये आग लागून एकाच कुटुंबातील सात जणांचा मृत्यू झाला आहे. मुंबई महापालिकेनं दिलेल्या माहितीनुसार या दुर्घटनेत सात जणांचा मृत्यू झाला. यात ७ वर्षे आणि १० वर्षे वयाच्या दोन चिमकल्यांचा समावेश आहे.

मुंबईत सध्या सर्वत्र नवरात्र उत्सवाचे वातावरण आहे. अशातच चेंबूर येथील सिद्धार्थ कॉलनी परिसरातील एका इमरतीला आग लागली. दुर्घटनेतील सातही मृत एकाच कुटुंबातील असल्याची माहिती मिळत आहे.

शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याचा अंदाज- याबाबत अधिक माहिती अशी की, सिद्धार्थ कॉलनी परिसरातील एका इमारतीला आग लागली. ही घटना पहाटे साडेपाच वाजता उजेडात आली आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाच्या जवानांकडून आगीवर नियंत्रण मिळवण्यात आले आहे. पालिकेने दिलेल्या माहितीनुसार, पहाटे पाच वाजून वीस मिनिटांनी अग्निशमन विभागाला संबंधित घटनेची माहिती देणारा फोन आला. आगीच्या घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी आगीवर नियंत्रण मिळवण्यास सुरुवात केली. ही आग लेव्हल वन प्रकारातील असून दुकानात शॉर्टसर्किट झाल्यामुळे आग लागल्याचं प्राथमिक अहवालात नमूद करण्यात आले आहे.

निवासी मजलादेखील आगीच्या भक्ष्यस्थानी- अग्निशमन विभागाने दिलेल्या माहितीनुसार, चेंबूरच्या सिद्धार्थ कॉलनी येथील ए एम गायकवाड मार्ग येथील एका इमारतीच्या तळमजल्यावर असलेल्या दुकानाला ही आग लागली. ही आग सुरुवातीला मर्यादित होती. मात्र, इलेक्ट्रिक वायरिंग आणि इलेक्ट्रिक इन्स्टॉलेशन, घरगुती वस्तू या आगीच्या संपर्कात आल्याने ही आग वाढली. आगीच्या भक्षस्थानी आलेली संबंधित इमारत दुमजली आहे. तळमजला अधिक वरचा मजला अशा स्वरूपाचे या इमारतीचे बांधकाम आहे. यातील तळमजल्यावर दुकान असून, वरचा वाजला निवासी म्हणून वापरला जातो. ही आग वाढल्याने निवासी मजलादेखील आगीच्या भक्ष्यस्थानी आला.बचाव कार्यानंतर इमारतीतील सर्व नागरिकांना बाहेर काढण्यात आले. त्यांना राजावाडी रुग्णालयात अधिक उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. मात्र, उपचारदरम्यान डॉक्टरांनी सर्व पाचही जखमींना मृत घोषित केल्याची माहिती पालिकेने दिली.

## पोलीस पाटलांच्या सर्व मागण्यांबाबत शासन सकारात्मक- मुख्यमंत्री एकनाथ शिंदे




दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी** : पोलीस पाटील हा गाव पातळीवरील प्रशासनाचा एक महत्त्वाचा घटक असून शासनाचे नाक, कान आणि डोळे आहेत. गावातील सर्व घटकांमध्ये समन्वय राखण्याचे काम पोलीस पाटील करीत असतात. त्यांच्या सर्व मागण्यांबाबत शासन सकारात्मक असून संवेदनशिलतेने निर्णय घेऊ,असे आश्र्वासन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज पोलीस पाटील संघटनेच्या मेळाव्यात दिले.

महाराष्ट्र राज्य पोलीस पाटील असोसिएशन संघटनेच्या वतीने राज्यस्तरीय आभार मेळावा व सत्कार समारंभ समृद्धी लॉन्स, हर्सूल सावंगी रोड येथे आयोजित करण्यात आला होता. पोलीस पाटीलांचे मानधन शासनाने १५ हजार रुपये केले त्यामुळे मुख्यमंत्र्यांचे आभार पोलीस पाटील संघटनेने व्यक्त केले. या मेळाव्यास जिल्ह्याचे पालकमंत्री अब्दुल सत्तार,शहर व औद्योगिक विकास महामंडळाचे अध्यक्ष संजय शिरसाट, आ. प्रदीप जयस्वाल, आ. रमेश बोरनारे, विभागीय आयुक्त दिलीप गावडे, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, तसेच पोलीस पाटील संघटनेचे अध्यक्ष महादेव नागरगोजे तसेच अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

दीपप्रज्वलनाने मेळाव्यास सुरुवात झाली. प्रास्ताविक महादेव नागरगोजे यांनी केले. यावेळी मुख्यमंत्र्यांचा पोलीस पाटील यांनी सत्कार केला.

सत्काराला उत्तर देतांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, पोलीस पाटील हे प्रशासनाचे नाक कान आणि डोळे आहेत. आपल्याला २४ बाय ७ काम करावे लागते. सरकारही असेच २४ बाय ७ काम करणारे आहे. आपले हे प्रामाणिक काम असल्यानेच शासनाने आपले मानधन साडेसहा हजार रुपयांवरुन १५ हजार रुपयांपर्यंत वाढवण्याचा निर्णय घेतला. सढळ हस्ते न्याय दिला आहे.

मराठवाडयाच्या विकासासाठी तसेच समाजातील विविध घटकांसाठी शासनाने राबविलेल्या योजनांचा उल्लेख करुन मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, कुटुंबातील प्रत्येक घटकाला शासन लाभ देत आहे. शिक्षण, आरोग्य, आर्थिक सबलीकरण, शेतकरी अशा सर्व घटकांना शासन विविध योजनांच्या माध्यमातून लाभ देत आहे. विकास आणि कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. पोलीस पाटील यांनी आपल्या गावात या योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवाव्या,असे आवाहन त्यांनी केले.

प्रास्ताविक अध्यक्ष महादेव नागरगोजे यांनी केले. पालकमंत्री अब्दुल सत्तार यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. कारभारी पाटील यांनी आभार मानले.

## वडील आयबी मंत्रालयात, आजोबा डीएम, आजीच्या प्रेरणेने अभिनेता बनले संजय मिश्रा

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/ प्रतिनिधी** : 'प्रत्येक कथेचा नायक शाहरुख खान नसतो. कधी कधी माझ्यासारखा सामान्य माणूसही त्याच्या कथेचा नायक असतो.' हा संवाद संजय मिश्रांचा आहे, जो त्यांनी 'अंग्रेजी मीडियम' चित्रपटात दिला होता. त्यांचे असे आणखी बरेच संवाद आहेत, जे थेट लोकांच्या हृदयाला भिडतात. गेल्या २९ वर्षांपासून ते बॉलिवूडचा एक भाग आहेत.

संजय मिश्रा यांनी १९९५ मध्ये रिलीज झालेल्या 'ओह डार्लिंग: ये है इंडिया' या चित्रपटातून बॉलिवूड करिअरला सुरुवात केली. या चित्रपटात ते शाहरुखसोबत दिसले होते. या चित्रपटापूर्वी त्यांनी टीव्हीमध्येही काम केले होते. १९९१ मध्ये 'चाणक्य' नावाच्या शोमध्ये ते दिसले होते. ६ ऑक्टोबर रोजी संजयचा ६१ वा वाढदिवस आहे. या निमित्ताने त्याच्याबद्दलच्या काही गोष्टी जाणून घेऊया ज्या कदाचित तुम्हाला आधीच माहित नसतील.



संजय यांचा जन्म बिहारमधील दरभंगा येथे झाला. मात्र, ते वाराणसीमध्ये लहानाचे मोठे झाले. त्यांचे वडील माहिती आणि प्रसारण मंत्रालयात (खइ) काम करत होते. त्यांचे आजोबा डीएम होते. आजोबा आणि वडील सरकारी नोकरीत असताना संजय यांना सुरुवातीपासूनच अभिनयाची आवड होती. आजीच्या प्रेरणेने ते अभिनेता झाले.

त्यांची आजी पाटणा रेडिओमध्ये गाणी गायची. संजय शाळेच्या सुट्ट्या आजीसोबत घालवायचा. संजय यांना अभिनयाची प्रेरणा त्यांच्या आजीच्या गायन कौशल्याने मिळाली. त्यांनी कठोर परिश्रम करून नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा, दिल्लीमध्ये प्रवेश घेतला. १९९१ मध्ये त्यांनी येथून पदवी प्राप्त केली आणि त्यानंतर ते केवळ अभिनयातच राहिले.

आज क्वचितच कोणी असेल, ज्याला पडद्यावर संजय मिश्रा आवडत नसेल. अभिनयात कसलीही प्रतिभा नसताना ते अभ्यासातही तेवढाच कमकुवत होते. ते दहावीत दोनदा नापास झाले होते. संजय मिश्रा यांच्याबद्दल एक गोष्ट अशीही सांगितली जाते की एनएसडी सोडल्यानंतर, जेव्हा त्यांचा सेटवर पहिला दिवस होता, ते 'चाणक्य' टीव्ही मालिकेसाठी पहिला शॉट देत होते, तो शॉट त्यांनी २० टेकमध्ये पूर्ण केला.

### माढ्यात शिंदे कुटुंबाकडे तुतारी सोपवून शरद पवार 'या' तीन मतदारसंघातील राजकारण कसं साधणार?

सोलापूर रू माढा विधानसभेसाठी सध्या सर्वात जास्त मागणी शरद पवार यांच्या तुतारीकडे असून यासाठी अनेक दिग्गज उमेदवारीकडे डोळा लावून बसले आहेत. यातच माढ्याचे सहा टर्म आमदार असणारे अजित पवार गटाचे बबन दादा शिंदे यांनी महायुतीला रामराम ठोकत तुतारी घेऊन निवडणूक लढविण्याची घोषणा केली आहे.

## खामगांव येथील नवीन जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाच्या कोनशिलेचे अनावरण

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/ प्रतिनिधी** : खामगांव येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय तसेच दिवाणी व फौजदारी न्यायालयाच्या नूतन इमारतीच्या कोनशिलाचे अनावरण सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती भूषण गवई व उपमुख्यमंत्री तथा विधी व न्यायमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज करण्यात आले.






नांदुरा रोडवरील प्रस्तावित नूतन न्यायालयाच्या ठिकाणी आयोजित समारंभप्रसंगी मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय, न्यायमूर्ती रविंद्र घुगे, न्यायमूर्ती नितीन सांबरे, न्यायमूर्ती नितीन सांबरे, न्यायमुर्ती भारती डांगरे, न्यायमूर्ती अनिल किलोर, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायधीश श्रीधर भोसले, जिल्हा न्यायाधीस तथा सत्र न्यायाधीश खामगांव गणेश जाधव, आमदार आकाश फुंडकर, डॉ. संजय कुटे, माजी आमदार चैनसुख संचेती व वकील संघाचे अध्यक्ष ड. संजय बडगुजर यांच्यासह संघाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

नूतन जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय तसेच दिवाणी व फौजदारी न्यायालय ही सर्व सोयीसुविधाने सुसज्ज पाच मजली इमारतीचे निर्माण होणार आहे. ही प्रशस्त इमारत राज्यात तालुकास्तरावरील न्यायालयाची पहिली मोठी इमारत ठरणार आहे. १०० हून अधिक वर्षापूर्वीच्या इंग्रजकालीन इमारतीच्या जागी नूतन इमारतीचे बांधकाम होणार असून १२ हजार ५०० चौ.फुट जागेवर जी प्लस फोर असे पाच मजल्याची इमारत उभी राहणार आहे.

या नूतन इमारतीमध्ये १२ कोर्ट सभागृह, पक्षकारांसाठी प्रतिक्षा कक्ष, महिला व पुरुष वकिलांसाठी स्वतंत्र बार कक्ष, स्वतंत्र ग्रंथालय, परिषद सभागृह, उद्वाहक व्यवस्था, वायफाय प्रणालीसह संपूर्ण इमारत वातानुकूलित असणार आहे, अशी माहिती यावेळी देण्यात आली.

# युवकांवरील चुकीचे गुन्हे नोंदविल्या निषेधार्थ मोर्चा

## हिंदू समाजातर्फे पोलिस प्रशासनाचा निषेध





दैनिक आपला विदर्भ

**देऊळगाव राजा/ प्रतिनिधी :** आरोपीला पकडून पोलिसांच्या हवाली करणाऱ्या पाच युवकांविरुद्ध पोलिसांनी नोंदविलेल्या गुन्ह्याच्या निषेधार्थ आज दि.६ आक्टोबर रोजी हिंदू समाज बांधवांच्या वतीने शहर बंदची हाक देत पोलीस प्रशासनाच्या निषेधार्थ भव्य मोर्चा काढला. यावेळी अन्यायकारक गुन्हे मागे घ्या अशी मागणी करण्यात आली.

दि.२ ऑक्टोबरच्या रात्री शहरातील एका युवकाने समाज माध्यमावर छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल आक्षेपाहार्य पोस्ट व्हायरल केली होती. सदर युवकाला पकडून मारहाण केली जात असताना पोलिसांनी त्या युवकाला त्यांच्या तावडीतून सोडविले आणि पोलिस ठाण्यात आणून आक्षेपाहर्य पोस्ट टाकणाऱ्या रेहन अमान शेख याच्या विरुद्ध गुन्हा नोंदविला. तर कायदा हातात घेतल्याबद्दल सुरज हनुमंते, संतोष जाधव, अशोक जाधव,अभि माने, साहिल मोगरकर व इतर व्यक्तीविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केले होते.

पोलिसांनी पाच युवकांवर अन्यायकारक गुन्हे नोंदविले असा आक्षेप घेत आज सकल हिंदू समाज बांधवांनी पोलीस प्रशासनाच्या निषेधार्थ घोषणा देत दि.६ ऑक्टोबर रोजी भव्य मोर्चा काढला. सदर मोर्चा बस स्थानक चौकात आला असता या ठिकाणी दादा व्यवहारे, विजय देवउपाध्ये, उदबोध महाराज पैठणकर, शुभम उपाध्ये, ॲड. सतीश नरोडे, राजेश भुतडा आदींनी आपले मनोगत व्यक्त करताना पाचही हिंदू युवकांवरील गुन्हे परत घेण्याची मागणी केली.

यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी मनीषा कदम आणि नायब तहसीलदार सायली जाधव यांना निवेदन देण्यात आले. श्री बालाजी महाराज मंदिरावर महाआरती करून सदर मोर्चाचे विसर्जन करण्यात आले.

# मराठा आंदोलकांच्या मागणीला शरद पवार यांचे समर्थन नाही

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची शरद पवार यांच्यावर टीका

दैनिक आपला विदर्भ




**बुलडाणा/ प्रतिनिधी :** मराठा आंदोलक जी मागणी करत होते. त्या मागणीला शरद पवार याचं समर्थन नाही. हे स्पष्ट झालेले आहे. त्यांची मागणी वेगळी आणि प्रतिक्रिया वेगळी आहे. अशी प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देत शरद पवार यांच्यावर टीका केली. बुलढाणा येथे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आले असता प्रसार माध्यमाशी ते बोलत होते. यावेळी मराठा आरक्षणासंदर्भात पत्रकारांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना प्रश्न केला असता, या प्रश्नावर उत्तर देताना फडणवीस म्हणाले की, मराठा आरक्षण मिळवून देण्यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत, तसेच शिवस्मारक समुद्रात झाले पाहिजे शिवभक्तांची इच्छा आहे.या स्मारकाचे भमिपूजन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झालेले आहे हे आरक्षण स्मारक समुद्रात व्हावे ही आमचीच इच्छा आहे.मात्र या स्मारकाच्या विरोधात कोर्टामध्ये जाऊन स्थगिती आणणारे कोण, ते कोणाचे वकील आहेत. हे छत्रपती संभाजी राजेंनी बघितले पाहिजे. काँग्रेस पक्षाच्या अधिकृत प्रचार करणारे वकील हे कोर्टात जाऊन छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक होऊ नये म्हणून बाजू मांडत आहे. याचाही निषेध संभाजी राजांनी केला पाहिजे.आम्ही कोर्टामध्ये सांगत आहोत आम्ही ते कोर्टाकडून मंजूर करून घेऊ, तसेच आरक्षण नाही मराठा आरक्षण नाही मिळवून देऊ असे मत देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले.

## राष्ट्रवादीचे नेते सचिन कुर्मी यांना संपविणाऱ्या तिघांना पोलिसांकडून बेड्या, हत्येचे कारण समोर

**मुंबई/ प्रतिनिधी :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसचे भायखळ्याचे नेते सचिन कुर्मी यांची शुक्रवारी मध्यरात्री हत्या झाली होती. त्यांच्या मारेकऱ्यांना पकडण्यात पोलिसांना यश आले असून भायखळा पोलिसांना तिघांना बेड्या ठोकल्या आहेत.

भायखळा येतील सचिन कुर्मी हत्याकांडातील तीन आरोपींना पोलिसांनी अटक केली. याप्रकरणी मुंबईच्या भायखळा पोलिसांनी तिघांना अटक केली असून, अनिल उर्फ अन्या काळे, विजय उर्फ पप्या काकडे आणि दिलीप वागसकर अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. शुक्रवार रात्री मुंबईतील भायखळा परिसरात सचिन यांची धारदार शस्त्राने वार करून हत्या करण्यात आली होती.

हितेंद्र ठाकूर यांच्या बविआला धक्का, राजीव पाटील भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याच्या चर्चा

या प्रकरणात आणखी आरोपी असून त्यांचा पोलीस शोध घेत आहेत. विजय उर्फ बुवा कुलकर्णी असे या प्रकरणात आणखी दोन संशयित असल्याची माहिती पोलीस सूत्रांनी दिली. कुलकर्णी हे गेल्या ४ दिवसांपासून पुण्यातील एका खासगी रुग्णालयात दाखल आहेत, तर दिलीप वाहस्कर याला पोलीस ताब्यात घेऊन त्यांची चौकशी करत आहेत.

## डॉ. तारा भवाळकर यांची ९८ व्या मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड

**पुणे/ प्रतिनिधी :** सरहद, पुणे आयोजित दिल्लीतील अ. भा. मराठी साहित्य संमेलन २१,२२ आणि २३ फेब्रुवारी रोजी तालकटोरा स्टेडिअम, दिल्ली येथे होणार आहे. या संमेलनाच्या अध्यक्षपदी लोकसाहित्याच्या व लोकसंस्कृतीच्या ज्येष्ठ अभ्यासक व लेखिका डॉ. तारा भवाळकर यांची एकमताने निवड करण्यात आली. पुण्याच्या महाराष्ट्र साहित्य परिषदेत अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाची बैठक संपन्न झाली.

या बैठकीस अ. भा. मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष प्रा. उषा तांबे, कार्यवाह उज्वला मेहेंदळे, कोषाध्यक्ष प्रकाश पागे, उपाध्यक्ष गुरय्या स्वामी, प्रा. मिलिंद जोशी, सुनिताराजे पवार, राजन लाखे यावेळी उपस्थित होते.

# स्वामी विवेकानंद यांचे विचार आणि जीवनकार्य युवा पिढीपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न – केंद्रीय मंत्री नितीन गडकरी

दैनिक आपला विदर्भ

## स्वामी विवेकानंद यांच्या जीवनावर आधारित मल्टीमीडिया शोचे लोकार्पण

**नागपूर/ प्रतिनिधी :** स्वामी विवेकानंद यांच्या जीवनावर आधारित 'स्वामी विवेकानंद : कहानी अनुभूती की' या मल्टीमीडिया–शो च्या माध्यमातून स्वामी विवेकानंद यांचे विचार आणि जीवनकार्य युवा पिढीपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न असल्याचे प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज येथे केले.

अंबाझरी येथील स्वामी विवेकानंद यांच्या जीवनावर आधारित मल्टीमीडिया शोचे लोकार्पण आज केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. मध्य प्रदेशचे मंत्री कैलाश विजयवर्गीय नागपूर सुधार प्रन्यासचे सभापती संजय मीना आदी यावेळी उपस्थित होते.

केंद्रीय मंत्री श्री.गडकरी म्हणाले की, देश निर्मितीमध्ये युवांची भूमिका महत्त्वपूर्ण असते. स्वामी विवेकानंद यांचे विचार सर्वांसाठीच प्रेरणादायी आहेत. हे विचार आणि त्यांचे जीवन कार्य या मल्टिमीडिया शोच्या माध्यमातून युवा पिढीपर्यंत विशेषतः शाळेतील मुलांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न येत्या काळात करण्यात येणार आहे. हिंदी, मराठी आणि इंग्रजी भाषेमध्ये या शोचे आयोजन करण्यात येणार आहे. याच धर्तीवर अंभोऱ्यात भगवद्गीता आणि भगवान गौतम बुद्ध यांच्या जीवनावर आधारित मल्टीमीडिया शोची निर्मिती करण्यात येत असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या वतीने निर्माण करण्यात आलेल्या या प्रकल्पाला 'स्वामी विवेकानंद : कहानी अनुभूती की' असे नाव देण्यात आले आहे. स्वामी विवेकानंद यांच्या जीवनावर आधारित हा शो असणार आहे. कन्याकुमारीच्या स्वामी विवेकानंद रॉक मेमोरियल आणि कोलकात्याच्या बेलूर मठावरुन स्फूर्ती घेऊन हा देखावा तयार करण्यात आला आहे. दाक्षिणात्य अभिनेत्री रेवती यांच्या दिग्दर्शनातून साकारलेला अंबाझरी येथील लाईट, साऊंड व मल्टीमीडिया शो आहे. या शोचा आत्मा असलेले ध्वनी संयोजन ऑस्कर अवॉर्ड विजेते रसूल पुकुट्टी यांचे आहे. तर प्रकाशयोजना एमी अवार्ड विजेते सिनेमाटोग्राफर अलफोन्स रॉय यांची आहे. तर संजय वडनेरकर यांचे पार्श्र्वसंगीत आहे. हा देखावा ६९ फूट लांबीचा असून उंची ३४ फूट आहे. येथे ३०० प्रेक्षकांची आसन व्यवस्था देखील आहे.




# कृषी वैभव लॉन येथे भव्य गरबा महोत्सवचे उद्घाटन

## मेहकर कृषी वैभव लॉन व चव्हाण चेस अकॅडमीच्यावतीने आयोजन

दैनिक आपला विदर्भ






**मेहकर/ प्रतिनिधी :** आदिशक्तीचा महोत्सव असलेल्या नवरात्र उत्सवात महिलांना आपला आनंद साजरा करता यावा, यासाठी चव्हाण चेस कॅडमीच्यावतीने मेहकर शहरातील कृषी वैभव लॉन येथे २०१६ पासून गरबा व दांडिया महोत्सव सुरू करण्याची परंपरा सुरु केली होती.

या गरबा महोत्सवाचे दि.४ ऑक्टोबर २०२४ रोजी केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांच्या धर्मपत्नी सौ.जयश्री जाधव, मेहकर विधानसभेचे आ. डॉ. संजय रायमुलकर यांच्या धर्मपत्नी सौ.रंजना रायमुलकर, कृषी वैभव लॉनच्या संचालिका रिंढे,युवा महिला नेतृत्व मयुरी जाधव व सौ. शालमली रायमुलकर तसेच पोलीस उपविभागीय अधिकारी पाटील यांची धर्मपत्नी सौ.कविता पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये सायंकाळी ७ वाजता आरती करून रितसर गरबा व दांडिया उद्घाटन करण्यात आले. नवरात्र उत्सवामध्ये महिलांना आपला आनंद द्विगुणीत करता यावा, यासाठी शहरामध्ये २०१६ पासून चव्हाण चेस अकॅडमी व कृषी वैभव लॉन यांच्या संयुक्त विद्यमाने गरबा महोत्सवाला प्रारंभ करण्यात आला होता.या परंपरेला अधिक दृढ करण्यासाठी कृषी वैभव लॉनचे संचालक महेश रिंढे यांचे मोठे पाठबळ चव्हाण चेस अकॅडमी ला मिळाले. चव्हाणचे अकॅडमीने कृषी वैभव लॉनच्या सहकार्याने सुरु केलेले गरबा व दांडिया महोत्सव नवव्या वर्षात पदार्पण करीत आहे.

यावेळी सर्व मान्यवराचे कृषी वैभव लॉन व चव्हाण चेस अकॅडमीच्या वतीने सौ.प्रिया चव्हाण यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. याप्रसंगी महिलांशी संवाद साधताना सौ.मयुरी जाधव यांनी महिलांचे मनोबल वाढविले व सर्वांचे कौतुक केले. तसेच सौ.शालमली रायमुलकर यांनी आपले विचार व्यक्त करताना महिला आता सर्व क्षेत्रात उत्तुंग भरारी घेत आहेत. महिला आता कोणत्याही क्षेत्रात मागे नाही असे त्यांनी सांगितले. उपस्थित सर्व मान्यवरांचे चव्हाण चेस अकॅडमीच्या संचालिका सौ. प्रिया चव्हाण यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.उपस्थित सर्व मान्यवरांनी गरबा खेळून कार्यक्रमाचे रितसर उद्घाटन केले. या गरबा व दांडिया महोत्सवात सहभागी होणाऱ्या सर्व महिलांना ट्रॉफी, प्रमाणपत्र व विशेष बक्षीस देऊन गौरविण्यात येते.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी वाशीम येथील सहाय्यक अभियंता संतोष चव्हाण, मेहकर येथील वनविभागाचे अधिकारी देवराव पवार, पुणे येथील राष्ट्रीय बुद्धिबळ मार्गदर्शक चेतन चव्हाण व इतर मान्यवरांनी कार्यक्रमाचे आयोजक महेश रिंढे, सुरेश चव्हाण व सौ.प्रिया चव्हाण यांनी सहकार्य केले.

## विविध वृत्त...

### नंदुरबारमध्ये भरधाव ट्रक मेंढ्यांच्या कळपात शिरला, १०० मेंढ्या चिरडून ठार; कोंडाईबारी घाटातील वाहतूक ठप्प

दैनिक आपला विदर्भ

**नंदुरबार प्रतिनिधी :** नंदुरबार जिल्ह्यातून एक अपघाताची मोठी बातमी समोर आली आहे. जिल्ह्यातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक सहावर वाहनाच्या कोंडाईबारी घाटात भरधाव ट्रकने मेंढ्यांना अक्षरक्ष: चिरडले आहे. यात सुमारे १०० हून अधिक मेंढ्या ठार झाल्याची माहिती पुढे आली आहे. परिणामी, रस्त्यावर मेंढ्यांच्या मृतदेहांचा खच पडला आहे. भरधाव वेगाने येणाऱ्या ट्रकने मेंढ्यांना चिरडल्याच्या या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. तर या अपघातामुळे मेंढ्या पाळणाऱ्यांचे मोठं आर्थिक नुकसान झालं असून एकच शोककळा पसरली आहे.

भरधाव ट्रकने १००हून अधिक मेंढ्यांना अक्षरक्ष: चिरडले

मिळालेल्या माहितीनुसार, धुळ्याहून सुरतच्या दिशेने जाणारी क्रमांक ए पी ३१ पी जी ०८६९ या वाहनाने रस्त्याच्या कडेने जाणाऱ्या जवळ जवळ १००हून अधिक मेंढ्यांना चिरडल्याची दुर्दैवी घटना घडली आहे.परिणामी, रस्त्यावर मेंढ्यांच्या मृतदेहांचा खच पडला आहे. तर या अपघातामुळे महामार्गावरील वाहतूक ठप्प झाली आहे. अपघात झाल्याची माहिती पोलिसांना माहिती मिळताच पोलीस प्रशासन तातडीने घटनास्थळी दाखल झाला आहे. कोंडाईबारी घाटात वारंवार अपघात होत असतात. मात्र उपायोजना शून्य दिसून येत आहेत. तर या अपघताचे नेमके कारण अद्याप कळू शकले नाही. सध्या पोलीस पुढील तपास करत आहे. मात्र या या अपघातामुळे मेंढ्या पाळणाऱ्यांचे मोठं आर्थिक नुकसान झालं आहे. सध्या वाहतूक सुरळीत करण्याचे काम पोलीस प्रशासन करत आहे.

डोळ्या देखत मेंढपाळांवर दु:खाचा डोंगर

या घटनेतील मेंढ्यांचे मालक लखा गोविंदा गोईकर, बाळु सोमा गोईकर, दगडु गोईकर (रा.विजापूर ता.साक्री जि.धुळे) हे आपल्या शेकडो मेंढ्यांचा कळप घेऊन विसरवाडीच्या दिशेने गुजरात राज्यात जात होते. दरम्यान, मागून येणारा एका भरधाव ट्रकने त्याच्या १००हून अधिक मेंढ्यांना अक्षरक्ष: चिरडल्या आहेत. हा ट्रक आंध्रप्रदेश राज्याकडून गुजरातकडे जात होता. ट्रकचालक रमेश दुगंला (राजू) या ट्रकचालकाचे ट्रकवरील नियंत्रण सुटल्याने महामार्गावर हा अपघात झाल्याचे बोलले जात आहे. या कळपामध्ये काही मेंढ्या या गर्भवती असल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे. घटनास्थळावरून पोलिसांनी ट्रक चालकास ताब्यात घेतले आहे. स्थानिकांनी या घटनेचा रोष व्यक्त करत मोठा आक्रोश व्यक्त केला आहे. तर आपल्या घरातील सदस्याप्रमाणे मेंढ्यांचे पालन पोषण करणाऱ्या मेंढ्यांचा दुर्दैवी मृत्यूने मेंढपाळांवर दु:खाचा डोंगर कोसळला आहे.

नागपूरच्या बेसूर शिवारात ट्रकने गायींना चिरडले, आठ गाईंचा जागीच मृत्यू

नंदुरबार पाठोपाठ नागपूर जिल्ह्याच्या उमरेड तालुक्यातील बेसूर शिवारात देखील अशीच एक दुर्दैवी घटना घडली आहे. यात एका कोळशाच्या ट्रकने गायींना अक्षरक्ष: चिरडले आहे. तर या अपघातात चक्क आठ गाईंचा जागीच मृत्यू झाला आहे. भरधाव ट्रक कोळसा घेऊन समुद्रपूरच्या दिशेने जात असताना उतारावर गाडी न्यूट्रल केली असल्यामुळे ट्रकवर नियंत्रण सुटल्याची प्राथमिक माहिती पुढे आली आहे. दरम्यान, चरायला जात असताना आठ गाई या अपघातात दगावल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस आणि गावकरी घटनास्थळी दाखल झाले आहे. तर दुसरीकडे या घटनेचा नागरिकांमध्ये प्रचंड संताप व्यक्त केला जात आहे. परिणामी, बेशिस्तीने कोळशा ट्रक चालवणाऱ्या चालकांवर कारवाई करण्याची मागणी आता गावकऱ्यांकडून केली जात आहे.

### राज ठाकरेंनी सहकुटुंब घेतले सप्तश्रृंगी देवीचे दर्शन, नाशिकचा गड पुन्हा काबीज करणार?

दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/ प्रतिनिधी :** साडेतीन शक्तिपीठांपैकी अर्धेपीठ म्हणून सप्तश्रृंगी मातेची ओळख आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी सप्तशृंगी गडावर जाऊन 'सप्तशृंगी मातेचं' दर्शन घेतलं. यावेळी पत्नी शर्मिला ठाकरे आणि अमित ठाकरे उपस्थित होते. दरवर्षी राज ठाकरे दर्शनासाठी सहकुटुंब येतात.

४७ मतदारसंघाचा घेणार आढावा : यंदाच्या लोकसभा निवडणुकीत मनसेनेनं महायुतीला बिनशर्त पाठिंबा दिला. राज ठाकरे यांच्या बदललेल्या राजकीय भूमिकेमुळं त्यांच्यावर जोरदार टीका झाली. विधानसभा निवडणुकीत मनसे महायुतीत सामील होणार का? असा प्रश्न उपस्थित केला जात असताना राज ठाकरे यांनी विधानसभा निवडणूक स्वबळावर लढवण्याची घोषणा केली. राज्यातील सर्वच २८८ जागांवर उमेदवार उभे करण्याचा निर्णय मनसेने घेतला आहे. अशात राज ठाकरे यांनी महाराष्ट्र दौरा सुरू केला. मराठवाड्यातील दौऱ्यानंतर राज ठाकरे दोन दिवसीय नाशिक दौऱ्यावर आहेत. या दरम्यान ते उत्तर महाराष्ट्रातील ४७ मतदारसंघाचा आढावा घेणार असून उमेदवाराची चाचपणी केली जाणार आहे. विशेष म्हणजे नाशिकचा गड पुन्हा काबीज करण्यासाठी राज ठाकरेंच्या या दौऱ्यात रणनीती आखली जाणार असल्याचे म्हटले जातेय.

राज ठाकरे यांचे नाशिकवर विशेष प्रेम : राज ठाकरे यांचे सुरूवातीपासून नाशिकवर विशेष प्रेम आहे. मनसेच्या सत्ता काळात नाशिकचा विकास झाला. त्यात वाहत्या पाण्यावरील शंभर फुटी कारांजा, बॉटनिकल गार्डन, होळकर पुलावरील वॉटर कर्टन, शहरातील रिंग रोड या सारखी अनेक कामे झाली. विशेष म्हणजे कुठल्याही प्रकारच्या निधीचा महानगरपालिकेवर भार न पडू सीएसआर निधीतून ही कामे राज ठाकरे यांनी केली असल्याचे मनसे पदाधिकाऱ्यांनी सांगितले.